“जगदीश कदम यांच्या साहित्यातील कृषि जाणिवा : एक विवेचक अभ्यास ”

(कथा, कविता, नाटक आणि कादंबरीच्या संदर्भाने)

पीएच.डी. (मराठी) पदवीसाठी शोधकार्याची रुपरेषा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संशोधक

हेमचंद्र रवीचंद्र हडसनकर

नूतन महाविद्यालय, सेलू

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.नागनाथ पाटील

योगानंद महाविद्यालय, वसमतनगर जि.हिंगोली

“जगदीश कदम यांच्या साहित्यातील

कृषि जाणिवा : एक विवेचक अभ्यास ”

अनुक्रमणिका

प्रकरण पहिले
मराठी ग्रामीण साहित्य : पूर्वपिठीका व जाणिवांचे अवकाश

प्रकरण दुसरे
जगदीश कदम : व्यक्ती व वाङ्मयीन योगदान

प्रकरण तिसरे
जगदीश कदम यांच्या साहित्यातील जाणिवांचे वेगळेपण
(दलित, ग्रामीण, कृषि, स्त्रीवादी इ.)

प्रकरण चौथे
जगदीश कदम यांच्या साहित्यातील कृषि जाणिवा-१
(कथा व कांदबरी)

प्रकरण पाचवे
जगदीश कदम यांच्या साहित्यातील कृषि जाणिवा-२
(कविता व नाटक)

प्रकरण सहावे

निष्कर्ष व समारोप

“जगदीश कदम यांच्या साहित्यातील कृषि जाणिवा : एक विवेचक अभ्यास ”

मराठी ग्रामीण साहित्य आता सर्व अंगांनी समृध्द होत असल्याचा प्रत्यय, ह्या प्रवाहातील साहित्य निर्मितीचा ओघ पाहिल्यानंतर आपणास येतो आहे. ग्रामीण भागातील अनेक लेखक, कवी आपले अनुभव कलात्मक पातळीवर (कथा, कविता, नाटक, कांदबरी अशा विविध वाङ्मय प्रकाराच्या माध्यमातून) व्यक्त करीत आहेत. केवळ वर्णनाच्या पातळीवर केले जाणारे लेखन आता सूक्ष्मतेकडे वाटचाल करीत असून भावभावनांचे चित्रण मनोविशलेषणात्मक पध्दतीने केले जात असल्याचे चित्रही थोडयाफार प्रमाणात दिसत आहे.

मराठी ग्रामीण साहित्यात मोजकेच पण महत्वाचे लेखन करणारे लेखकही दिसून येतात. त्यांनी केलेल्या साहित्यनिर्मितीतील जाणिवांचे वेगळेपण चटकन जाणवेल असेही दिसून येते. जगदीश कदम हे अशा लेखकांपैकी एक आहेत. त्यांनी कथा, कविता, नाटक, कादंबरी अशा विविध वाङ्मय प्रकारात लेखन केलेले आहे. त्यांच्या लेखनात विविध जाणिवांचा (दलित, ग्रामीण, कृषी) प्रकर्षाने आढळ दिसून येतो. त्या जाणिवांचा साकल्याने अभ्यास व्हावा, त्यांचे स्वरुप विशेष नोंदवावेत. त्यातून काही निष्कर्षाप्रत यावे हा या शोध प्रबंध लेखनामागील उद्देश आहे.

<u>प्रकरण पहिले :-</u>

पहिल्या प्रकरणामध्ये मराठी ग्रामीण साहित्याची पूर्वपिठीका स्पष्ट करण्यात येईल. ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा आणि वाटचाल या संदर्भात विवेचन करण्यात येईल. ग्रामीण साहित्यामध्ये ज्या साहित्यकृती महत्वाच्या समजल्या जातात त्या साहित्यकृतीचे सामर्थ्य शोधण्याचा, तसेच ज्या जाणिवांमुळे त्यांचे सामर्थ्य उजागर होते आहे त्या जाणिवांचा शोध घेणे व त्या संदर्भात काही निरीक्षणे नोंदवणे ह्या प्रकरणात अपेक्षित आहे.

<u>प्रकरण दुसरे :-</u>

दुसऱ्या प्रकरणामध्ये जगदीश कदत यांची व्यक्ती म्हणून आणि लेखक म्हणून कशी जडण-घडण झालेली आहे, याचा शोध घेणे. एकच लेखक कथा, कविता, नाटक, कादंबरी अशा विविध साहित्य प्रकारात लेखन करतांना आपल्या जाणिवांचे अवकाश कसे व्यापक करु शकतो, वाङ्मय प्रकार बदलल्यानंतर त्याच जाणिवांची मांडणी कशा पध्दतीने करतो या संदर्भातील विवेचन या प्रकरणात करण्यात येईल.

<u>प्रकरण तिसरे :-</u>

जगदीश कदम हे मराठीतील एक सशक्त ग्रामीण लेखक म्हणून ओळखले जातात. त्यांनी कथा, कादंबरी, नाटक, कविता अश विविध वाङ्मय प्रकारात लेखन केलेले आहे. त्यांना राज्य शासनाच्या पुरस्कारासह इतर अनेक संस्थांचे पुरस्कार प्राप्त झालेले आहे. कदम हे प्रामुख्याने ग्रामीण लेखक म्हणून ओळखले जात असले तरी त्यांच्या साहित्यामध्ये दलित, स्त्रीवादी जाणिवा सुध्दा ठळकपणे दिसून येतात. मराठी साहित्यामध्ये असा प्रकार अभावानेच पाहावयास मिळतो. त्यामुळेच लेखकाचे वेगळेपण लक्षात येते. जगदीश कदम यांच्या साहित्यातून येणाऱ्या विविध जाणिवांचा शोध घेण्याच प्रयत्न ह्या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण चौथे :-

जगदीश कदम यांनी प्रारंभी कथा लिहिलेल्या आहेत. त्यांचे तीन कथासंग्रह प्रसिध्द झालेले आहेत. अलीकडेच त्यांची कादंबरी प्रसिध्द झालेली आहे. त्यांच्या कथा आणि कादंबरीतून आलेल्या कृषि जाणिवांचा शोध घेऊन त्याचे विवेचन ह्या प्रकरणात अपेक्षित आहे.

प्रकरण पाचवे :-

जगदीश कदम यांनी कविता, नाटक, एकांकिका ह्या वाङ्मय प्रकारात लेखन केलेले असून त्यांच्या साहित्य कृतींना राज्य शासनासह इतर अनेक संस्थांचे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. सिंगापुर येथे झालेल्या तिसऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलनातही निमंत्रित म्हणून ते सहभागी झाले होते. त्यांच्या कविता, नाटक व एकांकिकांमधून आलेल्या कृषि जाणिवांचे विवेचन प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण सहावे :-

शोध प्रबंधाच्या सहाव्या प्रकरणामध्ये संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधनाअंती हाताशी आलेले निष्कर्ष नोंदवण्यात येईल.

संदर्भ ग्रंथ

१. आनंद यादव - ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या.

२. आनंद यादव - ग्रामीण साहित्य आणि वास्तव.

३. कैलास सार्वेकर - मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास.

४. गणेश देशमुख - ग्रामीण साहित्याची सैध्दांतिक भूमिका.

५. नागनाथ कोत्तापल्ले - ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि शोध.

६. धनंजय कौर - म.फुले वाङ्मय.

७. भरत कचरे - नामदेव शेतकरी : एक परामर्श.

८. यशवंत मनोहर - आंबेडकरवादी मराठी साहित्य.

९. यशवंत मनोहर - साहित्य बांधिलकी आणि विद्रोह.

१०. रविंद्र ठाकुर - ग्रामीण साहित्य : ग्रामीण आणि दलित.

११. शिवसांब कापसे - जगदीश कदम यांची कविता.

१२. स.दा.कऱ्हाडे - संशोधन सिध्दांत चिकित्सा.

१३. स.दा.कऱ्हाडे - दलित साहित्य चिकित्सा.

१४. श्रीराम गुंदेकर - ग्रामीणी साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन.

१५. हरीश खंडेराव - आंबेडकरी साहित्य : जाणिवा आणि मानसिकता

१६. हेमलता पाटील - शहरी ग्रामीण व तांडयावरील स्त्री : अर्थिक व सामाजिक स्थिती.

१७. डॉ.वासुदेव मुलाटे - ग्रामीण कथा : स्वरुप आणि विकास.

१८. डॉ.वासुदेव मुलाटे - ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि दिशा.

१९. डॉ.वासुदेव मुलाटे - नवे साहित्य नवे आकलन.

२०. डॉ.वासुदेव मुलाटे - ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा.

२१. डॉ.वासुदेव मुलाटे - साहित्य : रुप आणि स्वरुप.

२२. डॉ.वासुदेव मुलाटे - साहित्य, समाज आणि परिवर्तन.

२३. डॉ. दादा गोरे - साहित्य : समीक्षा आणि आस्वाद.

२४. डॉ. दादा गोरे - साहित्यरुप.

२५. डॉ. दादा गोरे - पुन्हा साहित्यरुप.

२६. डॉ. रवींद्र ठाकुर - चर्चा आणि चिकित्सा

मार्गदर्शक **संशोधक**